## निशाणी क्र.८२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा धनको यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम २६ नियम ९ अन्वये वाद मिळकतीचे अतिक्रमण निश्चित करण्याकरिता मोजणीसाठी न्यायालयीन आयुक्तांच्या नियुक्तीकरिता दिलेला आहे.

०२. धनको यांचे अर्जातील थोडक्यात कथन असे की, ऋनको विरुद्ध यापुर्वीच ताबा वॉरंट जारी करण्यात आले होते. परंतु ऋनकोंनी ताबा देण्यास नकार दिल्याने व बेलीफ रिपोर्ट मध्ये वाद जमिनीच्या खुणा नसल्याने वॉरंटची बजावणी होऊ शकली नाही, करीता वाद जमिनीच्या दिनांक २७.०६.१९९५ रोजी उप अधिक्षक भुमी अभिलेख यांच्याकडील भुमापकाने केलेल्या मोजणी व नकाशाप्रमाणे पुन्हा मोजणी करुन हद्दी खुणा कायम करणे अत्यंत न्याय्य व आवश्यक आहे. त्याशिवाय धनकोस डिक्रीप्रमाणे ताबा मिळु शकणार नाही. धनकोने संबंधित कार्यालयात मा. न्यायालयाचे आदेशाप्रमाणे संपर्क केला असता संबंधित कार्यालयातून संबंधित संचिकेचा शोध चालु असल्याचे व आम्ही कोर्टात त्याबाबत रिपोर्ट सादर करु असे उत्तर दिले, करीता वरील कार्यालयास मा. कोर्टाने निशाणी क्र. ७३ वर केलेल्या आदेशाप्रमाणे वाद जमिनीची मोजणी करुन खुणा रोवण्यासाठी भुमापक यांची नेमणुक करणे अत्यंत न्याय्य, योग्य व आवश्यक आहे. करीता त्यांनी सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

०३. ऋनको यांनी त्यांचे म्हणणे अर्जाचे मलपृष्ठावर दाखल केले आहे. ऋनको कथन करतात की, धनको यांनी ऋनकोवर ताबा देण्यास नकार दिला, हा जो आरोप केला आहे तो ऋनकोला मान्य नाही. सदरची मोजणी करण्यास ऋनको यांची काहीही हरकत नाही.

०४. प्रस्तूत अर्ज, दरखास्त, त्यावरील आक्षेप आणि दस्तऐवज यांचे अवलोकन

केले. धनको यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. सदरची दरखास्त ही मुळ नियमित दिवाणी दावा क्र. १०/२००३ मधील हुकूमनाम्याचे अंमलबजावणीकरीता म्हणजेच दावामिळकत गट क्र. २११ पैकी १४ आर जमिनीचा ताबा मिळणेकरीता दाखल केली आहे. त्यानुसार ताबा वॉरंट काढण्याचा आदेश जारी करण्यात आला. तथापि सदर ताबा वॉरंटची अंमलबजावणी झाली नाही. तसेच उपअधिक्षक भुमी अभिलेख भोकरदन यांच्या कार्यालयाने दिनांक ०३.१२.२०२४ रोजीच्या जावक क्र. १०६५६ या पत्रान्वये कळविले की, ‘सदर मुळ दाव्याचे कामी केलेली मोजणी ही दिनांक २७.०६.१९९५ रोजी करण्यात आली असून सदरच्या हद्दी खुणा ह्या २९ वर्षाने कायम करण्याकरीता आदेशित करण्यात आले असल्यामुळे सदरकामी पुनःश्च मोजणी होणे गरजेचे आहे.’ अशा प्रकारे ऋनको यांनी धनको यांच्या जमीनीवर केलेले अतिक्रमण काढून त्या अतिक्रमीत जमीनीचा ताबा देणेकरीता झालेल्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याकरीता दावामिळकतीची पुनःश्च मोजणी करण्याकरिता न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करणे आवश्यक आहे. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेः

## आदेश

०१. प्रस्तूतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. उप अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, भोकरदन यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते.

०३. न्यायालयीन आयुक्त यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी मौजे वाढोणा, ता. भोकरदन, जि. जालना येथील धनकोची मिळकत गट क्र.२११ पैकी १४ आर या जमिनींची संयुक्त मोजमापे घेवून यातील धनकोच्या जमीनीवर ऋनको यांनी अतिक्रमण केले असल्यास तसेच या गटांमधील सहभागीदार असल्यास सर्व सहभागीदारांच्या जमिनींची मोजणी करून सविस्तर मोजणी नकाशा तयार करून, वाद मिळकत गट क्र.२११ मधील धनकोच्या नावे दर्शविलेल्या जमिनीवर काही एक अतिक्रमण असल्यास व ते अतिक्रमण

कोणी, कोणत्या बाजूने केले आहे हे त्याच्या क्षेत्रफळासह दर्शवून त्यांचा मोजणी नकाशा अहवालासह या न्यायालयाची रीट मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत न चुकता सादर करावा. न्यायालयीन आयुक्त यांनी आवश्यकता भासल्यास सदर मिळकतीं व्यतिरिक्त आजूबाजूच्या जमिनीची मोजणी करण्याचीही मुभा आहे.

०४. धनको यांनी न्यायालयीन आयुक्त यांची नियमाप्रमाणे योग्य ती फी भूमी अभिलेख विभागाकडे त्वरीत १५ दिवसाच्या आत भरावी व त्याची पावती दोन प्रतीत न्यायालयात दाखल करावी. तसेच योग्य ते दस्तऐवज संबंधीत कार्यालयात सादर करावेत.

०५. धनको यांनी वरील मुदतीच्या आत फी न भरल्यास व त्याची पावती न्यायालयात दाखल न केल्यास सदर आदेश हा आपोआप रद्द झाला असे समजण्यात येईल.

०६. धनको यांनी तशी पावती न्यायालयात जमा केल्यावर कमिशनर रिट काढण्यात यावी.

Digitally signed by ROHINI VISHNU PATIL
Date: 2025.02.25 13:25:09 +0530

दिनांकः २०.०२.२०२५ (श्रीमती आर. व्ही. पाटील)
भोकरदन. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भोकरदन

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः श्रीमती एस. आर. इंगळे,
न्यायालयाचे नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः २०.०२.२०२५

स्वाक्षरीत/–
लघुलेखकाची सही